महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई अंतर्गत
हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था
महाराष्ट्र शासनाची १०० टक्के अनुदानित संस्था, सोसायटीज नोंदणी कायदा १८६० अधिनियमान्वये नोंदणीकृत संस्था,
भारत सरकार, विज्ञान व औद्योगिक मंत्रालय, मान्यताप्राप्त "विज्ञान व औद्योगिक संशोधन संस्था"

Advt./CMYKPY/2026-27/03 **Date: 22.10.2026**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना

अ.क्र.	विभाग	भरावयाची पदे	आवश्यक शैक्षणिक अर्हता
१	प्रशासन/भांडार/लेखा विभाग/ प्रशिक्षण विभाग	४	BA. B.Com (मराठी व इंग्रजी टंकलंखन असल्यास प्राधान्य राहिल
२	विषविज्ञान विभाग	१	B.Sc in microbiology, Zoology, Pharma, Biotechnology and Any subject of Allied Science.
	एकुण	५	

उमेदवाराची पात्रता:

- उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी असावा.
- उमेदवाराची आधार नोंदणी असावी.
- उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे.
- उमेदवाराची कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी असावी.

योजनेचे नियम व अटी खालीलप्रमाणे:

१. सदर कार्य प्रशिक्षण कालावधी ११ महिने असेल व या कालावधीसाठी उमेदवारांना शासना मार्फत विद्यावेतन देण्यात येईल.

२. सदर विद्यावेतन लाभार्थ्याच्या थेट बँक खात्यात DBT द्वारे शासना मार्फत जमा करण्यात येईल.

३. उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्ष असावे.

४. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहीवासी असावा.

५. उमेदवाराची आधार नोंदणी असावी.

६. उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे.

७. उमेदवाराने कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करुन रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.

८. या योजनेत सहभागी होण्यासाठी उमेदवाराने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या या योजने साठीच्या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.

९. सदर कार्य प्रशिक्षणचा कालावधी ११ महिने असेल, सदरच्या अकरा महिन्याच्या कालावधीसाठी उमेदवारांना या योजनेतर्गत शासनामार्फत दरमहा १०,०००/- (दहा हजार) रुपये इतके विद्यावेतन देण्यात येईल.

१०. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संबंधित आस्थापनेकडून प्रशिक्षण यसस्वीरीत्या पूर्ण केल्याचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र देण्यात येईल.

११. या योजने अंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांना किमान वेतन कायदा, राज्य कामगार विमा कायदा, कामगार भविष्य निर्वाह निधी कायदा, कामगार नुकसान भरपाई कायदा व औद्योगिक विवाद कायदा लागू राहणार नाही.

पत्ता : आचार्य दोंदे मार्ग, परळ, मुंबई - ४०० ०१२. दूरध्वनी क्र. ०२२-२४१६०९४७, २४१६०९६१, २४१६०९६२, फॅक्स - ०२२-२४१६१७८७
email : haffkineinstitute@gmail.com • website: www.haffkineinstitute.org

१२. या योजनेंअंतर्गत प्रशिक्षणाथी महिन्यातून १० दिवस अथवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असला तर, सबंधीत प्रशिक्षणाथीस त्या मशमहिनयाचे विद्यावेतन अनुज्ञेय राहणार नाही.

१३. प्रशिक्षणाथीने वरील अटींची पूर्तता केली असली परंतु सदर प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणाच्या पहिल्याच महिन्यात प्रशिक्षण सोडून गेल्यास अशा प्रशिक्षणार्थी विद्यावेतनास पात्र राहणार नाही.

१४. या योजनेच्या दरम्यान प्रशिक्षणाथीस कायम / नियमित स्वरूपाचा रोजगार अथवा स्वयंरोजगार प्राप्त झाल्यास अथवा प्रशिक्षण सोडून गेल्यास अथवा अनधिकृत गैरहजर राहिल्यास या योजने अंतर्गत प्रशिक्षण व त्या अनुषंगाने विद्यावेतन घेण्यासाठी पात्र राहणार नाही.

१५. या योजने अंतर्गत शिकाऊ उमेदवारी (NAPS/MAPS) पूर्ण केलेले किंवा करीत असलेले उमेदवार पात्र राहणार नाहीत.

१६. एका उमेदवारास या योजनेचा लाभ एकदाच घेता येईल.

१७. ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक : https://forms.cloud.microsoft/r/zvpj3WPirb

ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचण आल्यास संपर्कासाठी इमेल: training@hafikineinstitute.org

ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी दि. २२ ऑक्टोबर २०२६ ते २५ नोव्हेंबर २०२६ सायं. ६.०० वाजेपयंत